# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 13/10/2023 (शुक्रवार) सकाळ

---

## मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे जनतेला आव्हान

सन २०२३ मध्ये सार्वजनिक नवरात्रोत्सव दिनांक १५/१०/२०२३ पासुन मोठया उत्साहात साजरा करण्यात येणार असुन त्यामध्ये सर्व ग्रामीण भागामध्ये सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाकडुन दुर्गा देवीची स्थापना करण्यात येते. कोणत्याही सर्वसामान्य नागरीकांकडुन जबरदस्तीने सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाकडुन वर्गणी गोळा केली जाणार नाही यावर पोलीस दलाकडुन बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असुन असा प्रकार घडल्यास नागरीकांनी ताबडतोब पोलीस स्टेशनला संपर्क साधावा अश्या मंडळाविरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. सार्वजनिक मंडळाकडुन देखील असे प्रकार त्यांचेकडुन घडु नये याची दक्षता घेण्यात यावी. असे आव्हान मा. श्री. हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी जनतेला केले आहे. सर्व जनेतेने सहकार्य करून येणारा उत्सव शांततेत पार पाडला जाईल याची काळजी घ्यावी.

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. मौदा :– दिनांक ३०/१०/२०२१ चे २३.१२ वा. दरम्यान फिर्यादी व मृतक नामे– अंबर पांडुरग तांबुलकर वय २९ वर्ष, रा. धानला यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे अप क्र. ६६०/२१ कलम ३०२, ३२४, ३४१, ५०४, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ३०/१०/२०२१ चे १२.०० वा. ते १३.०० वा. चे दरम्यान यातील मयत/फिर्यादी याने परमात्मा एक मंडळ कडुन ५०००/–रू उधार घेतले होते. उधार घेतलेले पैसे परत करण्याचे कारणावरून कोजागिरीच्या दिवशी मयत आरोपी वासुदेव श्रावन मुंदेकार वय ७३ वर्ष रा. धानला याचेसोबत वादविवाद झाला होता. त्या वादविवादाच्या कारणावरून **आरोपी नामे– १) चंद्रशेखर वासुदेव मुंदेकार, वय ४५ वर्ष २) मंगेश वासुदेव मुंदेकार वय २३ वर्ष ३) मयत आरोपी वासुदेव श्रावन मुंदेकार वय ७३ वर्ष रा. धानला** यांनी संगनमत करून फिर्यादी यास रस्त्यावर अडवुन शिवीगाळ केली व काठीने, फावडयाने व चाकुने मारून जखमी केले. मृतक फिर्यादी उपजिल्हा रूग्णालय भंडारा येथे उपचाराकामी भर्ती झाला. मृतकच्या उपचारादरम्यान दिलेल्या बयानावरून गुन्हा नोंद करण्यात आला होता उपचारादरम्यान फिर्यादी मरण पावल्याने सदर गुन्हयात ३०२ भादंवि अन्वये कलमवाढ करण्यात आली.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस निरीक्षक हेमंतकुमार खराबे यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर कोर्ट क्र. १५ श्रीमती नागुर मॅडम कोर्टामध्ये सादर केले. दिनांक १३/१०/२०२३ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर कोर्ट क्र. १५ श्रीमती नागुर मॅडम यांनी वरील सदर गुन्हयातील आरोपीस सदर गुन्हयातील आरोपी क्र. १ व २ कलम ३०२, ३४ भादवि मध्ये आजीवन कारावास व ५,०००/– रु. दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास. कलम ३४१, ३४ भादवि ०१ महिना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. साईखेडकर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि/१३२१ विकास वाटकर पो.स्टे. मौदा यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर